**तरुण भारत** ■ शनिवार, १६ जुलै २०२२

# डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांच्या 'गावठाण'ला पुरस्कार



दोडामार्ग : प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत. बाजूला गोव्यातील ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ प्रा. राजेंद्र केरकर व अन्य. समीर ठाकुर

वार्ताहर
दोडामार्ग

दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील प्रा. डॉ. प्रज्ञाकुमार गाथाडे यांच्या 'गावठाण' कथासंग्रहाला लातूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर ॲकॅडमीच्यावतीने देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याअनुषंगाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, गोव्यातील ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ प्रा. राजेंद्र केरकर यांच्या हस्ते महाविद्यालयात सत्कार करण्यात आला.

गाथाडे यांचा 'गावठाण' हा पहिलाच कथासंग्रह असून या कथासंग्रहामधून त्यांनी हुंडा, बेरोजगारी, दुष्काळ, ग्रामीण शहरी संघर्ष, शेतकऱ्यांचे प्रश्न, नैतिक–अनैतिक संबंध, पाणी, स्मशानभूमी आणि शिक्षण व्यवस्थेमधील प्रशन मांडले आहेत. यापूर्वी त्यांच्या कथासंग्रहाला अण्णाभाऊ साठे पुरस्कार, संकेत प्रकाशनाचा उत्कृष्ट वाङ:मय निर्मिती पुरस्कार मिळाले आहेत. या कथासंग्रहाला हा तिसरा पुरस्कार प्राप्त झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य अकादमी ही जुनी आणि प्रतिष्ठित संस्था असून गेल्या अनेक वर्षांपासून उत्कृष्ट साहित्य निर्मिती करणाऱ्या साहित्यिकांचा गौरव करते.

**महाविद्यालयातर्फे सत्कार**

रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल, श्रीफळ, असे या पुरस्काराचे स्वरूप असून ३१ जुलै रोजी लातूर येथे या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेट्ये महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्रा. राजेंद्र केरकर, भाई परमेकर, बाबुराव धुरी, सूचन कोरगावकर यांनी गाथाडे यांचे अभिनंदन केले आहे.